www.afternoonvoice.com

MACHO EVE

Afternoon™ VOICE

MUMBAI - TUESDAY • FEBRUARY 9, 2010 • Rs. 2/- • RNI No. MAHENG/2009/29332 • Volume 1 Issue 150

# Kashmir safe for all tourists: Rigzin

Nooruddin Inamdar

Kashmir is safe for all tourists are the introductory words of Nawang Rig zin, Tourism Minister, Jammu & Kashmir who came to Mumbai to promote tourism for Jammu & Kashmir. He was seen very confidence about the valley security for tourists.

J&K was known for its tourism about three decades ago. But terrorism has changed the face of Kashmir. Now, by the help of centre, internal and external securities have been beeped up.

"In 60s and 70s many films had made based on tourism in J&K. but in 80s and 90s terrorism has ruined the tourism," said Rigzin.

Mrs. Tanveer Jehan, Secretary, tourism department in J&K was accompanied by Rigzin. She said, "Tourism are boosting in J&K now."



Rigzin showed his concerned over the private tour operator and said, "Since high court has order to parked private vehicles away from historical monument bec - ause of security threat."

Afternoon
DESPATCH & COURIER
IN ITS SILVER JUBILEE YEAR 25

Partner with St. Angelo's COMPUTER EDUCATION Creating Global Careers
St. Angelo's COMPUTER EDUCATION Creating Global Careers

Dt. 10/2/10.

# Overwhelming response to TTF

BY A STAFF REPORTER

The 77th edition of TTF-OTM India's largest Travel and Tourism Fair, in Mumbai came to an end at the MMRDA Grounds, Bandra Kurla Complex.

TTF Mumbai witnessed an enthusiastic response. By the closing hour of the event the visitors' figure is expected to cross 15,000 including 8000 trade visitors. With over 600 participants from all over India and from 27 countries, TTF&OTM Mumbai became the biggest ever travel mart organized in India. The fair grew over 25% in size and number of participants over last year, clearly bucking the current industry trend. The robust growth in outbound tourism potential from India was reflected in a whopping 33% growth in the size of the outbound segment.

The Fair was inaugurated by Shri Nawang Rigzin, Minister of Tourism and Culture, Govt. of Jammu & Kashmir, in the presence of Shri Wang Dong Hai, The Consul General of People's Republic of China in Mumbai, Shri Derek Galpin, Managing Director of Canadian Tourism Commission, Smt. Tanveer Jehan, Secretary Tourism, Government of Jammu & Kashmir, Shri Sanjiv Agarwal, Chairman TTF & OTM, and a host of dignitaries from the travel industries from all over India and abroad.

DNA
DAILY NEWS & ANALYSIS
PUBLISHED FROM MUMBAI, PUNE, BANGALORE, AHMEDABAD & JAIPUR
Pg8
MUMBAI, TUESDAY, FEBRUARY 9, 2010

any countries where AIESEC is present.

## Tourism Fair begins on the Bandra-Kurla Complex ground

The TTF-OTM Tourism Fair, which has been the grand attraction of the Tourism sector, has begun on the Bandra-Kurla Complex ground and the Tourism Corporations of Jammu and Kashmir, Gujarat, Rajasthan, Karnataka and Maharashtra are participating in it. The Maharashtra Tourism Corporation stall has brochures of various tourism places. The domestic and foreign tourists prefer the tourist spots in Tarkarli, Mahabaleshwar, Tadoba, Matheran, Chikhaldara etc.

www.esakal.com
सकाळ
मुंबई । सोमवार, ८ फेब्रुवारी २०१० । किंमत २ रुपये ५० पैसे । पाने २० (८ पानी टुडेसह)

# पर्यटन महोत्सवाला अलोट गर्दी

## सांस्कृतिक कार्यक्रम, भेटवस्तूंची रेलचेल

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ७ : भारतातील सर्वांत मोठ्या पर्यटन महोत्सवाला आज रविवारी मुंबईकरांनी प्रचंड गर्दी केली होती. ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम फेअर व आऊटबाऊंड ट्रॅव्हल मार्ट (टीटीएफ-ओटीएम) यांच्या संयुक्त विद्यमाने वांद्रे-कुर्ला संकुलातील 'एमएमआरडीए' मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या ७७ व्या पर्यटन महोत्सवात विविध पर्यटन संस्था, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच भेटवस्तू या येथे येणाऱ्या प्रत्येकासाठी खास आकर्षण ठरत आहे.

भारतातील नवनव्या आणि जगभरातील अनेक अनभिज्ञ पर्यटनस्थळांची माहिती या ठिकाणी उपलब्ध होत असल्यामुळे पर्यटक, तसेच या क्षेत्रातील अभ्यासक यांनीही या ठिकाणी हजेरी लावली आहे.

**रोजगाराच्या संधी**

पर्यटनावर अवलंबून असणारे उद्योग, तसेच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी या ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न विभिन्न राज्यांच्या पर्यटन महामंडळांनी केलेला आहे. गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश, ईशान्येकडील राज्ये, पश्चिम बंगाल आदी २६ राज्ये यात सहभागी झालेली आहेत. महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाच्या वतीनेही या ठिकाणी येणाऱ्यांना विविध माहिती व योजना उपलब्ध करून आकर्षित करण्याचा, तसेच पर्यटन वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**उद्योगांना चालना**

महोत्सवाचे संयोजक संजीव आगरवाल यांनी या संदर्भात सांगितले, की हा महोत्सव म्हणजे पर्यटनाशी संबंधित असलेल्यांसाठी पर्वणी आहे. अनेक राष्ट्रांची अर्थव्यवस्था ही पर्यटनावर अवलंबून असते. त्यामुळे अशा पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी, तसेच देशाच्या किंवा राज्यांच्या महसुलात भर पाडून अर्थव्यवस्था अधिकाधिक मजबूत करण्यासाठी त्याचा उपयोग झाला पाहिजे, अशी आमची इच्छा असून, त्यानुसारच प्रयत्न केले जात आहेत. तसेच पूरक असे प्रकल्प राबविण्यात आले आहेत. अधिकाधिक पर्यटक, नागरिक, तसेच संस्थांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. हा महोत्सव सोमवार (ता. ८)पर्यंत आहे.

लोकमत HELLO
शुक्रवार, दि. ५ फेब्रुवारी २०१०

# मुंबईत भरणार आंतरराष्ट्रीय पर्यटन महोत्सव

मुंबई - देशातील सर्वात मोठा समजला जाणारा आंतरराष्ट्रीय पर्यटन महोत्सव ६ फेब्रुवारीपासून वांद्रे-कुर्ला संकुलातील एमएमआरडीए मैदानात सुरू होत आहे. जम्मू-काश्मीरचे पर्यटनमंत्री नवांग जोरा यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार असू महोत्सवाचे यंदाचे ७७वे वर्ष आहे.

ट्रॅव्हल अॅण्ड टुरिझम फेअर आणि आउटबाउंड ट्रॅव्हल मार्ट यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात महाराष्ट्र, गुजरात, केरळ, राजस्थान, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू-काश्मीर या राज्यांबरोबरच चीन, थायलंड, कॅनडा, तुर्कस्तान, केनिया, नेपाळ, भूतान यासारखे देशही या प्रदर्शनात सहभागी होत आहेत.

संपूर्ण जगाची सफर कशी करता येईल याची माहिती व योजना या पर्यटन महोत्सवात एका छताखाली उपलब्ध होईल. तसेच विविध स्तरांतील पर्यटकांसाठी या महोत्सवात अनेक संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नेहमीच्या पर्यटनाबरोबरच शैक्षणिक, वैज्ञानिक, व्यावसायिक तसेच इतर क्षेत्रातील पर्यटनाच्या नव्या संकल्पनाही या महोत्सवातून पुढे येणार असून समाजातील सर्वच घटकांना याचा लाभ होईल, अशी माहिती महोत्सवाचे आयोजक संजीव अगरवाल यांनी दिली. राज्यातील पर्यटन व्यवसाय वृद्धिंगत व्हावा हासुद्धा या महोत्सवामागचा हेतू आहे. त्यामुळे राज्यातील अनेक पर्यटन संस्थाही या महोत्सवात सहभागी होत आहेत. यानिमित्ताने व्यवसायाच्याही अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. पर्यटनाशी संबंधित सर्व बाबींचा या महोत्सवामध्ये समावेश आहे. त्यामुळे पर्यटनाची आवड असणाऱ्या अधिकाधिक लोकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अगरवाल यांनी केले आहे.

दैनिक
# मुंबई लक्षदीप
१ रुपया
वर्ष : ९ अंक : १६४ पाने ८ मुंबई, शनिवार, दि. ६ फेब्रुवारी २०१० किंमत १ रुपया
संपादक : डी. एन. शिंदे

# भारताचा सर्वात मोठा पर्यटन महोत्सव शनिवारपासून मुंबईत सुरु होणार!

**मुंबई, दि.५:** भारताचा सर्वाधिक मोठा समजला जाणारा ७७ वा आंतरराष्ट्रीय पर्यटन महोत्सव ६ फेब्रुवारीपासून मुंबईच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील एमएमआरडी मैदानावर सुरु होत आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन जम्मू व काश्मीरचे पर्यटनमंत्री नवांग जोरा हे करणार आहेत. ट्रॅव्हल अँड टुरिझम फेअर (टीटीएफ) व आऊटबाऊंड ट्रॅव्हल मार्ट (ओटीएम) यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी महाराष्ट्र, गुजरात, केरळ, राजस्थान, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू-काश्मीर आदी राज्यांबरोबरच चीन, थायलंड, कॅनडा, तुर्कस्तान, केनिया, नेपाळ, भूतान आदी राष्ट्रे देखील यात सहभागी झाली आहेत.

संपूर्ण जगाची सफर कशी करता येईल याची एकत्रित माहिती व योजना या टीटीएफ-ओटीएमच्या पर्यटन महोत्सवाच्या एका छत्राखाली उपलब्ध होणार आहे. त्याची संधी मुंबईकरांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. वेगवेगळ्या स्तरातील पर्यटकांसाठीही या महोत्सवात विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. शैक्षणिक, वैज्ञानिक, व्यावसायिक तसेच अन्य क्षेत्रातील पर्यटनाच्या नव्या संकल्पनादेखील यातून पुढे येत असून, समाजातील सर्व घटकांना त्याचा उपयोग होईल, अशी माहिती महोत्सवाचे आयोजन संजीव अगरवाल यांनी दिली.

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय वृद्धींगत व्हावा, हासुद्धा या महोत्सवामागचा हेतू आहे. त्यामुळेच इथल्या पर्यटन संस्थादेखील यात सहभागी झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळानेही त्यात सहभाग दिला आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने व्यवसायाच्यादेखील नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

पर्यटनाशी निगडीत असलेले सर्व घटक या महोत्सवात समाविष्ट करण्यात आले असून, त्यांच्याही विकासाच्या संधीचा विचार केला गेला आहे. व्यक्तीगत स्तरावर पर्यटकांनादेखील अधिकाधिक लाभ मिळावा, यासाठी आयोजक प्रयत्नशील आहे असेही अगरवाल यांनी सांगितले.